# १) कायद्याचे राज्य

१) 'कायद्याचे राज्य' या तत्त्वाचे आद्यप्रवर्तक कोण होते?

१) सर एडवर्ड कोक  २) मॉन्टेस्क्यू  ३) जेम्स I  ४) मेडिसन

२) पुढीलपैकी कोणाच्या मताप्रमाणे ''ड्रॉइट ॲडमिनीस्ट्रॅटिफ (Droit Administratif)'' हे कायद्याचे राज्य या तत्त्वाच्या विरोधी आहे ?

१) वेड  २) डायसी  ३) जॉन बोडिन  ४) मॉँटेस्क्यू

३) प्रशासनिक कायद्याप्रमाणे 'कायद्याची अधिसत्ता (Rule of Law) ही खालीलपैकी कशातून उत्पन्न झाली आहे?

१) फ्रेंच उक्ती 'la principle de legalite'  २) लॅटीन संज्ञा 'corpus juris sentium'

३) लॅटीन संज्ञा 'de lege lata'  ४) लॅटीन संज्ञा 'intra legem'

४) ''नेमो ज्यूडेक्स इन क्वॉझा सुवा'' हे खालीलपैकी कशाचे महत्त्वाचे तत्त्व आहे ?

१) नागरी कायदा  २) फौजदारी कायदा  ३) नैसर्गिक न्याय  ४) मानवाधिकार न्याय

५) 'ॲमिकस कुरी' हे संबोधन कशासाठी वापरतात ?

१) न्यायालयाचा मित्र वकील  २) न्यायालयाचा संदेशवाहक

३) न्यायालयाचा एक पगारी अधिकारी  ४) न्यायालयाचे ब्रिटिशकालीन नामाभिधान

६) भारतीय संविधानाच्या कोणत्या भागात ''कायद्याचे राज्य'' या तत्त्वाचा समावेश केला आहे ?

अ) संविधानाची प्रस्तावना  ब) भाग III – मूलभूत हक्क  क) भाग IV-A – मूलभूत कर्तव्ये

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१) अ आणि ब फक्त  २) अ, ब आणि क  ३) ब आणि क फक्त  ४) वरीलपैकी कोणताही नाही

७) अ) कायद्याचे समान संरक्षण  ब) कायद्याची सर्वोच्चता  क) कायद्यापुढे सर्व समान

या पैलूंचा पुढीलपैकी कोणत्या तत्त्वामध्ये समावेश होतो ?

१) नैसर्गिक न्याय तत्त्वे  २) कायद्याचे राज्य

३) सत्तेच्या विभाजनाचा सिद्धान्त  ४) वरीलपैकी कोणत्याच नाही.

८) पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे?

a) भारतीय संविधानाने स्वीकारलेली व अंतर्भूत केलेली कायद्याच्या राज्याची त्रिसूत्रीय संकल्पना डेविस ने विषद केली.

b) कायद्याचे राज्य यात सम्मीलित आहे स्वेच्छानिर्णय वगळणे व निश्चित नियम.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (a)  २) केवळ (b)  ३) दोन्हीही  ४) एकही नाही

९) 'कायद्याची अधिसत्ता' हे खालीलपैकी कशाचा भाग आहे?

१) नैसर्गिक न्याय  २) स्थानिक कायदा  ३) नैतिक मूल्ये  ४) शिस्त

१०) खालीलपैकी दोनपैकी कोणते विधान **चूक** आहे?

a) शासन आणि जन अधिकारी हे नियमित कायदेशीर प्रक्रियेपासून मुक्त आहे.

b) कायद्याचे राज्य हे तत्त्व भारतीय संविधानात अंतर्भूत आहे.

**पर्यायी उत्तरे –**

१) केवळ (a)  २) केवळ (b)  ३) दोन्ही  ४) एकही नाही

११) कायद्यापुढे समानता हे ...... याचे दुसरे तत्त्व आहे.

१) रेस–ज्युडीकॅटा  २) कायद्याचे राज्य

३) अधिकारांचा विभक्तपणा  ४) न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार

## २) सत्ता विभाजन व प्रत्यायुक्त कायदे

१) प्रशासकीय कायद्याची मुख्य उगमस्थाने खालीलपैकी कोणती नाहीत?

a) न्यायाधीशांचे निर्णय
b) समित्यांचे अहवाल/अभिप्राय
c) रूढी आणि वहिवाट
d) सरकारने केलेले नियम/कायदे/ठराव
e) प्रशासकीय रीत

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (c) २) (b) आणि (c) ३) (b) आणि (e) ४) (c) आणि (e)

२) खालीलपैकी कोणते प्रशासकीय कायद्याचे उगम आहे/आहेत?

१) कायदे कानून
२) मंडळाचे अहवाल (Committee Reports)
३) प्रशासकीय चाली-रिती
४) वरीलपैकी सर्व

३) खालीलपैकी कशामध्ये प्रशासन कायद्याचे मूळ आहे?

१) राज्यघटना २) कायदे ३) केस कायदा ४) वरील सर्व

४) पुढील दोन पैकी कोणते विधान **चुकीचे** आहे?

a) प्रशासनिक कायद्यान्वये मूळ कायद्यातून निर्माण झालेले दुय्यम अथवा हस्तांतरित केलेले कायदे (नियम, उपविधी) अवैधानिक असले तरी, मूळ कायदा वैधानिक असू शकतो.

b) जर दुय्यम कायदा मूळ कायद्याच्या अधिकाराबाहेर असेल तर असा कायदा अवैधानिक राहील.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (a) २) केवळ (b) ३) दोन्ही ४) एकही नाही

५) खालीलपैकी कोणाद्वारे बनविल्या जाणाऱ्या विधिविधानास प्रत्यायुक्त विधिविधान असे म्हणतात ?

१) संसद २) राज्य विधानमंडळ ३) न्यायमंडळ ४) वरील एकही नाही

६) खालील विधान वाचून अचूक पर्याय निवडा.

विधी मंत्रालयाने तयार केलेला मसुदा कच्चा असल्याचे कारण देत प्रतिबंधात्मक स्थानबद्धता वाढविणारे विधेयक मे १९७५ मध्ये सभापतींना विरोधकांनी रद्द करण्याची आवश्यकता पटवून दिली. अशा उदाहरणांचे वर्णन कशा प्रकारे केले जाते ?

१) विधिमंडळाची सक्रियता
२) आत्यंतिक विधीवाद
३) कार्यकारी मंडळाची सक्रियता
४) प्रशासकीय सक्रियता

७) प्रशासकीय कायद्याच्या मान्यतेनुसार पुढील बाब ही प्रशासकीय स्वेच्छेने राबविली जाते.

१) शारीरिक चाचणी २) मौखिक चाचणी ३) लेखी चाचणी ४) वरील सर्व

८) प्रत्यायुक्त विधिविधानाच्या स्थापनेसाठी प्रत्येक एक अध्यक्ष आणि गरजेनुसार उपाध्यक्षांची नेमणूक केली जाते, प्रत्येक प्रत्यायुक्त विधी विधानाच्या अध्यक्षाची पात्रता खालील निष्कर्षावर आधारित आहे.

१) हे की ते एखाद्या महाविद्यालयाचे प्राचार्य असणे अनिवार्य आहे.

२) हे की अध्यक्ष होण्यासाठी त्या व्यक्तीला किमान २ वर्षे भारत सरकारच्या कार्यालयात सचिवपद कार्य केलेले असावे अथवा केंद्र/राज्य शासनाच्या सेवेत वरिष्ठ श्रेणीत (ज्यांची वेतनश्रेणी सचिवापेक्षा कमी पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी नाही) नेमणूक असावी.

३) हे की ती व्यक्ती खासदार असावी.

४) हे की ती व्यक्ती निवृत्त जिल्हा न्यायाधीश असावी.

९) ए. के. क्रायपाक विरुद्ध केन्द्र (AIR 1970S. C. 150) च्या खटल्यामध्ये खालीलपैकी कोणता मुद्दा होता?

१) आर्थिक पक्षपात २) वैयक्तिक पक्षपात ३) विषय पक्षपात ४) वरील सर्वच

## ३) प्रशासकीय स्वेच्छानिर्णय

१) भारतात खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत प्रशासकीय अधिकाऱ्याने बजावलेल्या स्वेच्छानिर्णय अधिकाराचे न्यायिक पुनर्विलोकन होऊ शकते?
१) प्रशासकीय निर्णयाची योग्यता बघण्यासाठी
२) साक्षी पुराव्याची योग्यता पुन:पडताळण्यासाठी
३) निर्णयप्रक्रिया बरोबर झाली किंवा नाही हे पडताळण्यासाठी
४) वरीलपैकी एकही नाही.

२) खालीलपैकी कोणते कृत्य प्रशासकीय स्वेच्छानिर्णय ***नाही*** ?
१) जमीन संपादन करणे २) जन्म मृत्यूची नोंद ठेवणे
३) मालमत्ता जप्त करणे. ४) व्यक्तींना स्थानबद्ध करणे.

३) 'नेमो डिबेट इसे इंडेक्स इन प्रोप्रिया क्वॉझा' (Nemo debit Esse Index in Propria Causa) या लॅटिन मॅक्झीमचा पुढीलपैकी काय अर्थ आहे?
१) राजा कधीही चूक करत नाही.
२) कोणीही व्यक्ती स्वत:च्या प्रकरणात न्यायाधीश असू शकत नाही.
३) बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला शिक्षा देण्यात येणार नाही.
४) जो ऐकेल तोच निर्णय देईल.

४) एखादा दस्त सादर करणे लोकहितामध्ये नाही हे विशेष अधिकाराचे समर्थन असू शकते. खालीलपैकी कोणती बाब लोकहितामध्ये मोडत नाही?
१) संरक्षण व्यवस्थेला बाधक २) उत्तम राजनैतिक संबंध
३) कार्यक्षम लोकसेवा ४) राष्ट्रपतीचे वैवाहिक संबंध

## ४) प्रशासनिक न्यायाधिकरणे

१) राज्यघटनेच्या कोणत्या घटनादुरुस्तीने संसदेला प्रशासनिक न्यायाधिकरणे स्थापन करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे?
१) एक्केचाळीसावी घटनादुरुस्ती १९७६ २) बेचाळिसावी घटनादुरुस्ती १९७६
३) त्रेचाळिसावी घटनादुरुस्ती १९७७ ४) चव्वेचाळिसावी घटनादुरुस्ती १९७७

२) खालीलपैकी कोणत्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनिक न्यायाधिकरणाची कसोटी सांगितलेली आहे ?
१) फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया वि. पंजाब राज्य २००१
२) एक्स्प्रेस न्यूजपेपर वि. भारत सरकार १९५९
३) फेडरेशन ऑफ रेल्वे ऑफिसर्स असोसिएशन वि. भारत सरकार २००३
४) असोसिएटेड सिमेण्ट कंपनी लिमिटेड वि. मध्य प्रदेश राज्य २००३

३) प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या अनुषंगाने जोड्या लावा :

| **अधिनियम** | **प्रशासनिक न्यायाधिकरण** |
|---|---|
| a) औद्योगिक वाद अधिनियम, १९४७ | i) निवडणूक न्यायाधिकरण |
| b) भारतीय आयकर अधिनियम, १९६१ | ii) अपील न्यायाधिकरण |
| c) लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ | iii) केंद्र सरकार |
| d) कंपनी अधिनियम, १९५६ | iv) कामगार न्यायाधिकरण |

**पर्यायी उत्तरे :**

**(a) (b) (c) (d)**

१) (i) (ii) (iii) (iv)
२) (ii) (iii) (iv) (i)
३) (iv) (ii) (i) (iii)
४) (ii) (iv) (iii) (i)

४) प्रशासनिक न्यायाधिकरण कायद्याची संविधानिक कायदेशीरता खालीलपैकी कोणत्या खटल्यात, ज्यात काही महत्त्वाच्या कायद्याचा मुद्दा प्रस्थापित झाला तसेच ज्यात सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले?
१) म्युनिसिपल कार्पोरेशन ऑफ दिल्ली वि. बिर्ला कॉटन मिल्स
२) एस. पी. संपतकुमार वि. युनियन ऑफ इंडिया
३) करतार सिंग वि. पंजाब राज्य
४) ए. के. क्रेपक वि. युनियन ऑफ इंडिया

५) खालीलपैकी कोणता अधिकारी न्यायाधिकरण म्हणून भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२७ नुसार ग्राह्य आहे?
१) वैयक्तिक पंच २) पंचायत कोर्ट ३) कौटुंबिक न्यायाधिकरण ४) जकात अधिकारी

६) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणासंबंधीत खालीलपैकी कोणती विधाने बरोबर **नाहीत** ?
a) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण ही संविधानाचे कलम ३२३-A अंतर्गत स्थापन झालेली घटनात्मक संस्था आहे.
b) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण ही प्रशासकीय न्यायाधिकरण कायदा, १९८५ अंतर्गत स्थापित एक वैधानिक संस्था आहे.
c) याचे सदस्य हे फक्त प्रशासकीय अनुभव असणारे अधिकारी यांच्यातून नेमले जातात.
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (a) २) फक्त (b) ३) (a) आणि (b) दोन्ही ४) (a) आणि (c) दोन्ही

७) प्रशासनिक न्यायाधिकरणाला ...... हे बंधनकारक नाही.
१) पूर्वीचा दाखला २) रेस-ज्युडीकेटा तत्त्व ३) प्रतिबंध ४) वरील सर्वच

८) खालीलपैकी कोणते विधान हे प्रशासकीय न्यायाधिकरणाला लागू नाही?
१) दिवाणी न्यायालयाचे काही अधिकार त्यांना आहेत.
२) साक्षी पुराव्याचे तांत्रिक नियम तंतोतंत बंधनकारक आहेत.
३) नैसर्गिक न्यायाची तत्त्वे बंधनकारक आहेत.
४) निर्णय देताना कारणे देणे बंधनकारक आहेत.

९) खालीलपैकी प्रशासकीय न्यायाधिकरणे कोणती आहेत?
a) प्राप्तिकर अपिलीय न्यायाधिकरण b) कामगार विमा न्यायालय
c) कॉपीराईट बोर्ड d) औद्योगिक न्यायालय
**पर्यायी उत्तरे –**
१) फक्त (a) २) (a) व (d) ३) (a) व (b) व (d) ४) वरीलपैकी सर्व

१०) प्रशासनिक न्यायाधिकरण .......... नुसार अस्तित्वात येतात.
१) विभाग २) प्रशासन ३) कायदा ४) न्यायपालिका

११) खालीलपैकी बरोबर विधान/ने निवडा :
I) प्रशासनिक न्यायाधिकरण काही प्रमाणात न्यायालयासारखे भासतात.
II) प्रशासनिक न्यायाधिकरणाला भारतीय पुराव्याच्या कायद्यांतील तरतुदी किंवा प्रक्रिया बंधनकारक नाही.
१) फक्त I २) फक्त II ३) वरील I आणि II ४) वरीलपैकी काहीही नाही.

१२) खालीलपैकी कोणती/त्या संस्था वैधानिक नाहीत?
अ) राष्ट्रीय विकास परिषद ब) विद्यापीठ अनुदान आयोग
क) नियोजन आयोग ड) केंद्रीय दक्षता आयोग

१) फक्त अ　　२) अ आणि ब　　३) अ आणि क　　४) ब आणि ड

१३) **प्रतिपादन (A)** : नियोजन आयोग ही घटनात्मक संस्था नाही आणि वैधानिक संस्थाही नाही
**कारण (R)** : केंद्रीय कॅबिनेटच्या कार्यकारी ठरावानुसार नियोजन आयोगाची स्थापना झाली आहे
१) दोन्ही A आणि R बरोबर आहेत, R हे A चे बरोबर स्पष्टीकरण आहे.
२) A आणि R बरोबर आहेत, R हे A चे बरोबर स्पष्टीकरण नाही.
३) A बरोबर आहे, पण R बरोबर नाही.
४) A बरोबर आहे, पण R बरोबर आहे.

१४) खालीलपैकी कोणते प्रशासनिक न्यायाधिकरण नाही?
१) कामगार न्यायालय　　२) भाडे नियंत्रक　　३) रेल्वे दर न्यायाधिकरण　　४) वरील एकही नाही

१५) खालीलपैकी कोणते हे प्रशासनिक न्यायाधिकरणाचे वैशिष्ट्ये **नाही?**
१) हे एका कायद्यानुसार बनते.
२) याला न्यायिक अधिकार असतात.
३) याला साक्षीपुरावा व प्रक्रियेचे कडक नियम लागू होतात.
४) हे कागदपत्र सादर करण्याची सक्ती करू शकते.

## ६) नैसर्गिक न्यायाची तत्त्वे

१) खालीलपैकी कोणती लॅटिन मॅग्झिम नैसर्गिक 'न्यायाचे तत्त्व' (निर्णयापूर्वी ऐकून घेण्याच्या अधिकारासंबंधी) सांगते?
१) रेस ज्युडीकॅर्टा　　२) नेमो कॉट नॅचरल　　३) ऑडी ऑल्टरम पारटेम　　४) जस्टीस रेस सीट रिया

२) ''नैसर्गिक न्याय तत्त्वास'' इंग्लिश कायद्यामध्ये पुढील दोन तत्त्वांद्वारे मान्यता देण्यात आली आहे:
a) नेमो डाट क्वोड नॉन हॅबेट　　b) नेमो ज्युडेक्स इन कॉझा सुआ　　c) ऑडी आल्टरम पार्टेम
**पर्यायी उत्तरे :**
१) (a) आणि (b)　　२) (b) आणि (c)　　३) (a) आणि (c)　　४) वरील सर्व

३) पुढील सिद्धांतांचा विचार करा.
a) अल्ट्रा व्हायरस　　b) ऑडी अल्ट्रेम पार्टेम
c) डेलीगेट्स नॉन पोटेस्ट डेलीगेर　　d) नेमो ज्यूडेक्स इन कॉझा सुआ
यापैकी कोणते सिद्धांत नैसर्गिक न्यायतत्त्वांच्या संदर्भात आहेत?
१) (a) आणि (c)　　२) (b) आणि (d)　　३) (a), (b) आणि (c)　　४) वरील सर्व

४) नैसर्गिक न्यायाचा नियम ....... ला लागू होत नाही?
१) कायदे करण्यासंबंधी कायदेमंडळाची कृती　　२) न्यायालयाविषयक कृती
३) प्रशासकीय कृती　　४) वरीलपैकी एकही नाही

५) खालीलपैकी कोणत्या बाबतीत नैसर्गिक न्यायतत्त्वांची पायमल्ली करण्यात आली?
a) एका अधिकाऱ्यापुढे केस चालली परंतु दुसऱ्याच अधिकाऱ्याने निकाल दिला.
b) विनंती करणाऱ्या अर्जदाराला त्याची बाजू ऐकून घेण्यास बोलावले पण तो आलाच नाही.
c) गुंतागुंतीचे किंवा न्यायिक प्रश्न उदभवत नाही म्हणून वकिली मदत दिली गेली नाही.
d) परीक्षेच नक्कल करताना विद्यार्थ्याला पकडले आणि त्याचे म्हणणे ऐकून न घेता त्याला पुढील परीक्षेला बसण्यास अटकाव केला.
**पर्यायी उत्तरे :**
१) (a) आणि (b)　　२) (a) आणि (d)　　३) (c) आणि (d)　　४) (b) आणि (d)

६) पुढील कोणते विधान **अयोग्य** आहे ?

a) एखादा कायदा अमलात येण्याअगोदरच्या, त्या कायद्याने प्रतिबंधित केलेल्या कृत्याकरता कोणीही दोषी ठरविले जाऊ शकत नाही.

b) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा खटला चालवता येत नाही.

c) कोणीही स्वत:विरुद्ध साक्षीदार होऊ शकत नाही.

**पर्याय :**

१) फक्त (a) २) फक्त (b) ३) फक्त (c) ४) वरील सर्व

७) खालील विधाने वाचा :

अ) परीक्षेत कॉपी करताना धरलेल्या विद्यार्थ्याला त्याची बाजू मांडण्याची संधी न देता परीक्षा देण्यापासून वंचित केले.

ब) त्याला बाजू मांडण्याची संधी दिली, पण त्याने ती घेतली नाही.

क) 'क्ष' ला कायदेविषयक मदत (वकील) पुरवली नाही कारण ''तत्त्व'' किंवा ''कायदा'' या संदर्भात काहीच क्लिष्टता नव्हती. (क्लिष्ट प्रश्न नव्हते)

ड) निवड समितीतील एक सभासद स्वत: उमेदवार होता.

वरीलपैकी कोणत्या प्रकरणी नैसर्गिक न्याय तत्त्व पाळले गेले ?

१) ब आणि क मध्ये पाळले गेले अ आणि ड मध्ये नाही.

२) अ, ब, क मध्ये पाळले गेले ड मध्ये नाही.

३) कोणत्याच प्रकरणी नैसर्गिक न्यायतत्त्वे पाळली गेली नाहीत.

४) अ शिवाय इतर सर्व प्रकरणी पाळली गेली.

८) नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांमध्ये खालीलपैकी कशाचा अंतर्भाव होत ***नाही*** ?

१) ज्युरींच्या सल्ल्यांशिवाय कोणताही निर्णय देता येणार नाही.

२) न्यायाधीश पूर्वग्रहरहित असेल.

३) व्यथित पक्षाला बाजू मांडण्याची योग्य संधी देण्यात यावी

४) ज्याने ऐकले असेल (केस) त्यानेच न्याय द्यावा.

९) योग्य निकाल देण्यासाठी न्यायमंडळानी ....... चा अवलंब करणे आवश्यक असते.

१) खुलेपणा २) नि:पक्षपातीपणा ३) नैसर्गिक न्यायाची तत्त्वे ४) कार्यपद्धती

## ७) दक्षता आयोग

## ८) लोकपाल आणि लोकायुक्त

## ९) लोकसेवकांना संविधानिक संरक्षण

१) भारतीय पुरावा कायदा कलम १२३ अंतर्गत जेव्हा राज्याच्या कारभारासंबंधीत असलेल्या कामकाजासंबंधी अप्रकाशित नोंदीमधून पुरावा द्यायचा असेल तेव्हा कोणाची परवानगी घेणे आवश्यक आहे ?

१) अशा परवानगी जरुरी नाही २) राज्याचा मुख्यमंत्री

३) मुख्यमंत्र्याचा सचिव ४) संबंधित विभाग प्रमुख

# भारतीय साक्षीपुरावा अधिनियम

१) अप्रकाशित शासकीय माहितीबाबत पुरावा देणेबाबत तरतूद, पुरावा कायद्याच्या पुढील कलमात दिलेली आहे.

१) कलम १२१ २) कलम १२३ ३) कलम १२५ ४) कलम १२७

२) खालीलपैकी कोणत्या तत्त्वावर भारतीय पुरावा कायद्याने कलम १२३ 'राज्याच्या कामासंबंधीचा पुरावा' आधारित आहे ?

१) ऑडी अल्टेराम पार्टेम
२) नेमो ज्यूडेक्स इन प्रोप्रिया कॉझा सूआ
३) व्हिज मेजॉर
४) सॅलस पॉप्युलिएस्ट सुप्रिमा लेक्स

३) ...... नीतिवचनाचा आधार व हेतू हा भारतीय पुराव्याच्या कायद्यातील कलम १२३ चा पाया आहे.
१) नल्ला पोइना साइन लेजी
२) सॅलम पॉप्युलिस्ट सुप्रीमा लेक्स
३) इन बोना पार्टेम
४) क्वी फॅसीट पर ॲलीयम फॅसीट पर से.

४) भारतीय पुरावा कायदा १८७२ च्या कलम १२३ नुसार प्रकाशित न झालेल्या शासकीय कार्यालयीन नोंदीसंबंधी पुरावा देणेबाबत परवानगी ही, अधिकाऱ्यास किंवा संबंधित विभागप्रमुखास :
१) त्यास योग्य वाटल्यास देईल अथवा स्थगित करेल
२) परवानगी द्यावीच लागेल
३) परवानगी देऊ शकत नाही.
४) परवानगीची आवश्यकता नाही.

५) विभाग प्रमुखाच्या परवानगीशिवाय कोणत्या मुद्यावर राज्यातील कार्यालयीन अप्रकाशित नोंदीवर आधारित पुरावा देता येणार ***नाही.***
१) विभागीय धोरण
२) सार्वजनिक धोरण
३) अधिकारीय धोरण
४) वरीलपैकी काहीही नाही

६) राज्याच्या कोणत्याही कारभारासंबंधीच्या अप्रकाशित शासकीय दप्तरामधून उपलब्ध होणारा कोणताही पुरावा देण्यास परवानगी :
१) कुठलाही राज्यसरकारचा कर्मचारी/अधिकारी देऊ शकतो.
२) पोलीस अधिकारी देऊ शकतो.
३) मुख्यमंत्री देऊ शकतो.
४) संबंधित विभागाचा मुख्य अधिकारी देऊ शकतो.

७) शासकीय गुपिते अधिनियम १९२३ आणि माहिती अधिकाराचा कायदा २००५ यामध्ये परस्परविरोधी तरतुदी आढळल्यास कोणत्या तरतुदी लागू होतील?
१) शासकीय गुपिते अधिनियम १९२३
२) प्रत्येक केसची परिस्थिती आणि तथ्ये यावर अवलंबून राहील.
३) माहिती अधिकाराचा कायदा २००५ च्या तरतुदी
४) कोर्टास योग्य वाटेल त्या.

८) शासकीय गुपिते अधिनियम १९२३ च्या तरतुदी कोणाला आणि कोठे लागू आहेत?
a) संपूर्ण भारतभर
b) जम्मू आणि काश्मीर सोडून उर्वरित भारतभर
c) भारताबाहेर असलेले शासकीय सेवेतील लोकांना
d) भारताबाहेर रहिवास करणारे भारतीय नागरिकांना

**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (a) आणि (c)   २) फक्त (b) आणि (c)   ३) फक्त (a) आणि (d)   ४) (a), (c) आणि (d)

# (२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६

## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ : अभ्यासक्रमात नमूद विषय व उपविषय

१) व्याख्या, जमिनीचे वर्गीकरण आणि प्रकार
२) जमिनीचा वाप्र आणि त्यात बदल करण्याची प्रक्रिया
३) जमीन महसुलाची आकारणी
४) जमिनीची नोंदणी
५) अपील, पुनर्रतपासणी आणि पुनर्विलोकन

# (३) काही सुसंबद्ध कायदे

## काही सुसंबद्ध कायदे : अभ्यासक्रमात नमूद विषय व उपविषय

१) **नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ :** व्याख्या, उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाय योजना.

२) **पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ :** व्याख्या, उद्दिष्टे, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना.

३) **भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ :** व्याख्या, उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाय योजना.

४) **अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ :** व्याख्या, उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाय योजना

५) **माहिती तंत्रज्ञान अधिनियम २000 (सायबरविषयक कायदा) :** व्याख्या, प्राधिकरणे, इलेक्ट्रॉनिक शासन, अपराध आणि शिक्षा.

६) **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ :** व्याख्या, अर्जदाराचे अधिकार, सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य, माहिती मधील अपवाद, अपील, शिक्षा.

७) **पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे देखभाल व कल्याण अधिनियम २००७ :** व्याख्या, उद्दिष्ट, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाय योजना

८) **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ :** व्याख्या, उद्दिष्टे, बालकांचा शिक्षणाचा अधिकार, शासनाचे कर्तव्य तसेच शाळा व शिक्षकांच्या जबाबदाऱ्या.

* **ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६**

या प्रकरणामध्ये एकूण ८ कायद्यांचा अभ्यास आहे. या प्रकरणामध्ये प्रत्येक कायद्याच्या अभ्यासामध्ये कोणत्या मुद्यांवर भर द्यावा. ते मुद्दे आयोगाने नमूद केलेले आहेत. त्याचबरोबर या कायद्यांमधील इतर काही पूरक व संलग्न मुद्यांचा अधिक विस्ताराने अभ्यास करावा. या घटकावर विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची अधिकाधिक उत्तरे देता यावीत याकरिता संपूर्ण कायद्याचे स्पष्टपणे आकलन करावे.

पर्यावरण संरक्षण अधिनियमाच्या अभ्यासामध्ये आयोगाने नमूद केलेल्या मुद्यांशिवाय त्यातील व्याख्या, अधिकारपदे व त्यांची कार्ये इत्यादींचा अभ्यास करावा. केंद्र सरकार, या अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने काही नियम (Rules) तयार करते, त्याचा अभ्यास करावा – पर्यावरण (संरक्षण) नियम १९८६.

सध्याच्या सामाजिक व्यवहार व प्रशासकीय चलनवलनामध्ये 'माहिती अधिकार अधिनियम' प्रभावी ठरलेला आहे. हा संपूर्ण कायदा व त्यातील तपशील अभ्यासावा. या कायद्यातील तरतुदींबरोबर त्याबाबतच्या चालू घटना म्हणजे –या कायद्याची पार्श्वभूमी, तिच्याशी संबंधित चळवळी, एनजीओ – अरुणा रॉय यांची 'कामगार किसान शक्ती संगठन' राजस्थान, हा कायदा करणाऱ्या घटकराज्यांची क्रमवारी, २००५ पूर्वी केंद्र सरकारने केलेला २००२ सालचा माहिती स्वातंत्र्य अधिनियम इत्यादी बाबी, अभ्यासाव्यात.

अभ्यासक्रमातील सर्व कायद्यांमध्ये माहिती–तंत्रज्ञान अधिनियम (२000) सर्वात जास्त विस्तृत आहे. 'सायबर कायदा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या कायद्याचा अभ्यास करताना पुढील मुद्दे महत्त्वाचे ठरतात – व्याख्या, प्रमाणन अधिसत्ता, अपीलीय न्यायाधिकरणे व सायबर गुन्ह्यांशी संबंधित एकूण २२ महत्त्वाची कलमे, त्यात नमूद असलेले सायबर

अपराध व त्यासाठी असलेल्या शिक्षा, इत्यादी. याबरोबरच गुन्हे अन्वेषण करणारी यंत्रणा व अधिकारी आणि २००८ सालच्या सुधारणा अधिनियमाद्वारे केलेल्या महत्त्वाच्या सुधारणा अभ्यासाव्यात.

गेल्या दोन दशकांपासून राष्ट्रीय जीवनात भ्रष्टाचाराची प्रकरणे, त्यातील नोकरशाहीचा सहभाग व लोकपाल आंदोलन या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाचा अभ्यास करताना पुढील घटकावर भर द्यावा – भ्रष्टाचार, लोकसेवक या महत्त्वपूर्ण संज्ञा, उद्दिष्टे, तपास करणाऱ्या यंत्रणा व अधिकारी, त्यांचे अधिकार क्षेत्र, भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळण्यासाठी स्थापन झालेली विशेष न्यायालये, न्यायाधीशांची पात्रता–नियुक्ती व अधिकार, चौकशी व खटला उभारणीपूर्वी प्रशासकीय अधिकाऱ्यांना 'पूर्वसंमती'चे असलेले संरक्षण, त्यातील सक्षम अधिसत्ता, नागरिकांशी संबंधित असलेली कलमे– ८, ९ व १२, लोकसेवकाच्या भ्रष्टाचाराशी संबंधित असलेली कलमे – ७, १०, ११, १३, १४ व १५, दोषी व्यक्तींना होणाऱ्या शिक्षा इत्यादींबाबतच्या तरतुदी.

भारतात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी कायद्याच्या क्षेत्रामध्ये शासनाच्या पुढाकारातून जे कायदे अस्तित्वात आले, त्यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ आणि नियम १९९५ यांचा अभ्यास करताना पुढील मुद्दे महत्त्वाचे ठरतात –कायद्याची उद्दिष्टे, महत्त्वाच्या संज्ञा, प्रकरणांचा तपास करणाऱ्या यंत्रणा व अधिकारी, त्यांचे अधिकार, अनुसूचित जाती व जमातीच्या तक्रारदाराचे अधिकार, पोलीस अधिकाऱ्यांची कर्तव्ये, गुन्ह्यांचे स्वरूप व दिली जाणारी शिक्षा, प्रकरणे हाताळणारी विशेष न्यायालये, राज्यसंस्थेची भूमिका व कर्तव्ये, विविध यंत्रणा व अधिकारी, त्यांचे अधिकार क्षेत्र, विविध अपराधांची नुकसानभरपाई म्हणून त्यांना देण्यात येणारी नुकसानभरपाई.

नागरी हक्क संरक्षण अधिनियमाची (१९५५) तयारी वरील मुद्यांच्या आधारे करावी.

माहितीचा अधिकार व कार्यालयीन गुप्तता अधिनियम या दोन्ही कायद्यांचा उद्देश परस्परविरोधी आहे. त्यामुळे याबाबतचे विविध खटले, गुप्तता अधिनियमावर परिणाम करणाऱ्या माहिती अधिकारातील तरतुदी आणि दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने याबाबत केलेली शिफारस अभ्यासावी.

## काही सुसंबद्ध कायदे : घटक आणि उपघटकावरील प्रश्नसंख्या

| | घटक –उपघटक/ प्रश्न व गुणसंख्या | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ | – | २ | १ | ३ | १ | २ | ३ | १ |
| २. | पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ | २ | १ | १ | ४ | २ | २ | १ | २ |
| ३. | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ | २ | २ | ३ | १ | २ | १ | १ | ३ |
| ४. | अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ | ४ | ६ | – | ३ | ६ | ७ | ४ | ३ |
| ५. | माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० | ५ | २ | १ | १ | ३ | – | ५ | ३ |
| ६. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ | १ | १ | – | – | ३ | ४ | ३ | ४ |
| | शासकीय गुपिते अधिनियम, माहितीचा अधिकार | २ | २ | ३ | १ | २ | – | २ | – |
| ७. | पालक व ज्येष्ठ नागरिक अधिनियम २००७ | – | – | – | – | – | – | – | १ |
| ८. | मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ | – | – | – | – | – | – | – | २ |
| * | ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ | २ | २ | २ | ४ | २ | २ | ३ | १ |
| | **एकूण** | **१८** | **१८** | **११** | **१७** | **२१** | **१८** | **२२** | **२०** |


## THIS SAMPLE IS OVER

To buy complete MPSC Mains GS II course click on the link below -
https://www.studycircleonline.com/notes/GSII-Laws/154
To buy complete MPSC Mains course inclusive of the complete syllabus click on the link below-
https://www.studycircleonline.com/courses/mpsc-mains-20-21-complete-course-/13
or visit www.studycircleonline.com